7 SEP 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात बी.ए.स्पोर्टस् अभ्यासक्रम सुरू

## ३० विद्यार्थ्यांनी घेतला प्रवेश; आंतरराज्य खेळाडूंचा सहभाग

▶ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे बी.ए.स्पोर्टस या तीन वर्षीय पदवी अभ्यासक्रमाचा प्रारंभ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. प्रमोद पाटील, व्ही. एन. शिंदे, शरद बनसोडे, पी. टी. गायकवाड, सुभाष पवार, आदी उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे बी.ए.स्पोर्टस या तीन वर्षीय पदवी अभ्यासक्रमाची सुरूवात झाली. त्यासाठी ३० विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत. त्यात तीन आंतरराज्य खेळाडूंचा समावेश आहे.

या पदवी अभ्यासक्रमाचा प्रारंभ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'बी.ए.स्पोर्टस् या पदवी अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी देशाचे आदर्श खेळाडू आणि समाजातील जबाबदार नागरिक व्हावेत. विद्यार्थ्यांना एका पेक्षा जास्त खेळामध्ये पारंगत होण्याची संधी या माध्यमातून निर्माण झाली आहे. संलग्नित महाविद्यालयांनी तालुका पातळीवर हा अभ्यासक्रम राबविल्यास खेळाडूंना निश्चित प्रोत्साहन मिळेल. या अभ्यासक्रमाच्या पहिल्या तुकडीचे विद्यार्थी होण्याचे भाग्य या प्रवेशित विद्यार्थ्यांना लाभलेले आहे. या ठिकाणी उत्कृष्ट मार्गदर्शकांची टिम अभ्यासक्रमातील खेळाडू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. विद्यापीठ विद्यार्थीकेंद्रीत योजना आणि अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील आहे.' क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सुचय खोपडे, ॲथलेटिक्सचे आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षक सुभाष पवार, मनीषा शिंदे, पृथ्वी सरनाईक आदी उपस्थित होते. विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# विद्यापीठात इंडो-जपान विज्ञान तंत्रज्ञान परिषद

## सहस्त्रबुद्धे, यासुकाता यांच्या उपस्थितीत उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात येत्या ७ ते ९ सप्टेंबर या कालावधीत १३ व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्हअंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, मुंबईतील जपानचे कॉन्सुलेट जनरल डॉ. फुकाहोरी यासुकाता यांच्यासह कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ८ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात परिषदेचे उद्घाटन होईल, अशी माहिती विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय कक्षाचे प्रमुख डॉ. एस. बी. सादळे यांनी दिली.

परिषदेच्या ८ सप्टेंबरला होणाऱ्या उद्घाटन समारंभास भारताचे जपानमधील राजदूत सिबी जॉर्ज, आयसीटी मुंबईचे इमेरिटस्, प्राध्यापक डॉ. जी. डी. यादव, जपान सोसायटी फॉर दि प्रमोशन ऑफ सायन्स (जेएसपीएस) या संस्थेचे अध्यक्ष सुजीनो सुयोशी आणि इंडियन जेएसपीएस अल्युम्नाय असोसिएशनचे (आयजेएए) अध्यक्ष डी. शक्तिकुमार उपस्थित राहणार आहेत.

उद्घाटनानंतर पद्मश्री डॉ. जी. डी. यादव यांचे 'दि नेट झिरो गोल अँड सस्टेनेबिलिटी' या विषयावर बीजभाषण होईल. प्रा. हिरोफुमी यामादा अध्यक्षस्थानी असतील.

तरुण भारत

# विद्यापीठात इंडो-जपान आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषद आजपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात ७ ते ९ सप्टेंबर या कालावधीत १३ व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्हअंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेचे आयोजन केले आहे. भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, मुंबईतील जपानचे कॉन्सुलेट जनरल डॉ. फुकाहोरी यासुकाता यांच्यासह कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ८ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वा. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात परिषदेचे उद्घाटन होईल, अशी माहिती विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय कक्षाचे प्रमुख डॉ. एस. बी. सादळे यांनी दिली.

तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत भरगच्च विज्ञान व तंत्रज्ञानविषयक चर्चासत्रांसह सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन केले आहे. ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता प्रा. योशिरो अझुमा यांचे व्याख्यान होईल. शनिवारी, ९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता शालेय विद्यार्थ्यांसाठी 'ईग्नाइटिंग माईंड्स ऑफ स्कूल चिल्ड्रेन' या विषयावर होईल. ८ सप्टेंबर रोजी उद्घाटनप्रसंगी भारताचे जपानमधील राजदूत सिबी जॉर्ज, आयसीटी मुंबईचे इमेरिटस प्राध्यापक डॉ. जी. डी. यादव, जपान सोसायटी फॉर दि प्रमोशन ऑफ सायन्स या संस्थेचे अध्यक्ष सुजीनो सुयोशी आणि इंडियन जेएसपीएस अल्युम्नाय असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. डी. शक्ती कुमार उपस्थित राहतील.

07 SEP 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# कोल्हापूरच्या रस्ता सुरक्षा, हवेच्या गुणवत्तेवर चिंता व्यक्त

## शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागात कार्यशाळा : पर्यावरण शिक्षण केंद्र, परिसर संस्थांच्या तज्ज्ञांसह प्राध्यापक, अभ्यासकांचा सहभाग

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर शहरातील खराब रस्त्यांची गंभीर स्थिती, या रस्त्यांवरून जाणाऱ्या पादचारी नागरिक आणि वाहनधारक यांची सुरक्षा, वाहनांची वाढती संख्या, त्यातून निर्माण होणाऱ्या प्रदूषणाबरोबर शहरातील कचऱ्यांची वाढती समस्या आणि त्यामुळे शहरातील हवेच्या गुणवत्तेच्या स्तरावर होणारा परिणाम यावर शिवाजी विद्यापीठातील पर्यावरण शास्त्र विभागात झालेल्या चर्चासत्र चिंता व्यक्त करण्यात आली. तसेच यावर मार्ग काढण्यासाठी काही उपाययोजनाही या चर्चेदरम्यान तज्ज्ञांनी सुचविल्या. कायद्याची अंमलबजावणी करण्याबरोबर नागरिकांचा सकारात्मक सहभागही महत्वाचा असल्याची मांडणी या चर्चेत दरम्यान तज्ज्ञांनी केली.

पर्यावरण शिक्षण केंद्र (CEE) व परिसर या संस्था आणि शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरण विज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'शाश्वत परिवहनासाठी रस्ते सुरक्षा, हवेची गुणवत्ता परिवर्तन' याविषयावर कार्यशाळेचे पर्यावरण शास्त्र विभागाच्या सभागृहात मंगळवारी आयोजन केले होते. यावेळी रोड सेफ्टी नेटवर्क ही भारतातील रस्ते सुरक्षित व्हावेत या मुद्यावर काम करणाऱ्या आणि धोरणात्मक अंमलबजावणीसाठी पाठपुरावा करणाऱ्या संस्था, संघटना, कार्यकर्ते आणि अभ्यासकांची राष्ट्रीय पातळीवरील आघाडीत सदस्य संस्था असणाऱ्या पर्यावरण शिक्षण केंद्र (CEE) आणि परिसर संस्था यांच्या सदस्य, तज्ज्ञांनी कोल्हापूर शहराची परिवहन व्यवस्था, रस्ते, रस्तेसुरक्षा आणि प्रदूषण, हवेची गुणवत्ता याविषयी स्थानिक पर्यावरण तज्ज्ञ, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि पर्यावरण शास्त्र विभागातील विद्यार्थी यांच्याकडून वस्तुस्थिती दर्शविणारी माहिती जाणून घेतली. तसेच केल्या जाणाऱ्या उपाययोजना, त्यातील नेमकेपणा, त्रुटी विषयी समजून घेतले. या विषयांचे परस्परसंबंध समजून घेणे आणि स्थानिक नागरिकांच्या अनुभवांची देवाणघेवाण व चर्चा करणे असा या चर्चा सत्राचा उद्देश होता. पर्यावरण शिक्षण केंद्र आणि परिसर संस्थेतर्फे राज्य आणि देशपातळीवर चाललेल्या कामाची माहिती दिली. अनुभवही कथन केले. कार्यशाळेतील सहभागींनी उपस्थित केलेल्या अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठी कोल्हापूर शहरासाठी अधिक चांगली सार्वजनिक बस व्यवस्था असणे महत्वाचे आहे. राष्ट्रीय मानका-नुसार प्रति लाख लोकसंख्येमागे सुमारे ५० बसेस असणे आवश्यक आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'शाश्वत परिवहनासाठी रस्ते सुरक्षा, हवेची गुणवत्ता परिवर्तन' याविषयावरील कार्यशाळेत सहभागी प्राध्यापक, विद्यार्थी.**

गर्दी, रस्ते अपघात व वायू प्रदूषण कमी होण्यास कशा मदत होऊ शकते, या विषयावर परिसर संस्थेचे कार्यक्रम संचालक रणजीत गाडगीळ यांनी मार्गदर्शन केले. वरिष्ठ प्रकल्प अधिकारी संदीप गायकवाड रस्ते सुरक्षा याविषयावर मार्गदर्शन केले. पर्यावरण शिक्षण केंद्राचे अमरनाथ करण यांनी सिटी ॲक्शन प्लॅनसाठी मिळणाऱ्या निधीतून स्थानिक प्राधिकरणाची क्षमता वाढवणे, हवा गुणवत्ता व्यवस्थापन कक्ष उभारणी, नागरिकांपर्यंत पोहचणे आणि त्यांचा सहभाग, इतर घटकांशी समन्वय आदींसह धोरणात्मकबाबींसाठी सर्व निधी वापरणे, धूर, धूळ कमी करणे, सायकल चालवणे, चालणे, सार्वजनिक वाहतूक यांना प्रोत्साहन देणे, हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी कचरा व्यवस्थापनात सुधारणा करणे आदी उपाययोजनांसंदर्भात मार्गदर्शन केले.

यावेळी पर्यावरण शास्त्र विभागाच्या प्रमुख आसावरी जाधव, फेरीवाल्यांचे नेते कॉ. दिलीप पवार, विज्ञान प्रबोधनीचे उदय गायकवाड, प्रजासत्ताकचे दिलीप देसाई, सामाजिक कार्यकर्त्या गीता हसुरकर, वाचन कट्टाचे युवराज कदम, प्रभाकर पाटील, व्हाईट आर्मीचे अशोक रोकडे, कस्तुरी रोकडे, अभिजित कांबळे, तेजस पाटील, पर्यावरण विज्ञान विभागाच्या डॉ. रसिया पडळकर, डॉ. पल्लवी भोसले, विजय पेंढारले, पर्यावरण शिक्षण केंद्राचे कुणाल जयस्वाल, परिसर संस्थेचे सुशील पठारे व पर्यावरण विज्ञान विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.